दुष्काळग्रस्त मराठवाडयासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**सुधारित शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/( ७५/२०१९)/जसंअ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९

**संदर्भ :-** शासन निर्णय,जलसंपदा विभाग क्र. संकीर्ण-२०१९/(७५/२०१९)/जसंअ, दि.२३ ऑगस्ट,२०१९.

**प्रस्तावना :**

**१.०** केन्द्र शासनाने १९८० साली तयार केलेल्या नॅशनल परस्पेक्टीव्ह प्लॉन मध्ये देशातील एकूण ३० आंतरराज्यीय नदीजोड योजनांची आखणी करण्यात आली. उपरोक्त ३० नदीजोड योजनांपैकी महाराष्ट्र व गुजरात राज्यांमधील दमणगंगा-पिंजाळ (महाराष्ट्र) व पार-तापी-नर्मदा (गुजरात) या दोन आंतरराज्यीय योजना प्रस्तावित आहेत.

दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजनेत ८९५ दलघमी (३१.६० अ.घ.फू.) पाणी मुंबई शहराला पिण्याच्या पाण्यासाठी देणे प्रस्तावित आहे. तसेच पार-तापी-नर्मदा नदीजोड योजनेत गुजरात राज्यातील सौराष्ट्र व कच्छ भागात सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी महाराष्ट्र व गुजरात राज्यातील पाणलोट क्षेत्रातून एकूण १३३० दलघमी (४६.९६ अ.घ.फू.) पाणी उपलब्ध होणार आहे.

पार-तापी-नर्मदा व दमणगंगा-पिंजाळ या दोन आंतरराज्यीय योजनेचे नदी विकास अभिकरण (NWDA, नवी दिल्ली मार्फत सविस्तर प्रकल्प तयार करणेबाबत महाराष्ट्र, गुजरात व केंद्र शासन यांच्यात दि. ०३/०५/२०१० रोजी सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार प्रकल्प अहवाल तयार करणेत आला आहे.

दि. ३ मे २०१० च्या MOU मध्ये महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील उपलब्ध पाणी पश्चिम विभाजकावरून उपसा करून पूर्वेकडे वापरणेबाबत व्यवहार्यता अभ्यास महाराष्ट्र राज्य करेल, असे नमूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने केलेल्या अभ्यासानुसार खालील वळण योजना तापी खोऱ्यातील गिरणा उपखोरे व गोदावरी खोऱ्यासाठी प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) नार-पार-गिरणा | - | ३०४.६० दलघमी, | (१०.७६ अघफू) |
| २) पार-गोदावरी | - | ९७ दलघमी, | (३.४२ अघफू) |
| ३) दमणगंगा-वैतरणा-गोदावरी | - | २०२ दलघमी, | (७.१३ अघफू) |
| ४) दमणगंगा-एकदरे-गोदावरी | - | १४३ दलघमी, | (५.० अघफू) |

उपरोक्त योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण, नवी दिल्ली व वॅप्कॉस, नवी दिल्ली या दोन भारत सरकार उपक्रमामार्फत प्रगतीत आहे. सदर ४ वळण योजना या पार-तापी-नर्मदा व दमणगंगा-पिंजाळ या आंतरराज्यीय नदीजोड योजनांसोबत राष्ट्रीय प्रकल्प म्हणून राबविणे प्रस्तावित होत्या व त्यानुसार सामंजस्य कराराचा मसूदा केंद्र शासनास दि. २२/०९/२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

सामंजस्य करार मसुदयानुसार आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पामधील दोन्ही राज्यांतील प्रस्तावित पाणी वाटपाबाबत गुजरात शासनाने अद्याप सहमती दिलेली नाही. मुख्य सचिव स्तरावरून वाटाघाटी प्रगतीत असून या प्रक्रियेत दोन वर्षाचा कालापव्यय झालेला असून अद्याप गुजरात राज्याची सहमती अप्राप्त आहे. प्रस्तावित पार-तापी-नर्मदा व दमणगंगा-पिंजाळ या आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पातील दोन्ही राज्यातील पाणी वाटपाच्या गुंतागुंतीमुळे "महाराष्ट्राचे पाणी गुजरातला दिले जात आहे" असे चुकीचे संभ्रम लोकांमध्ये तयार करून प्रकल्पाला विरोध करण्याचे प्रयत्न स्थानिक पातळीवर होत आहेत.

उपरोक्त कारणे पाहता महाराष्ट्र राज्यातील उपरोक्त आंतरराज्यीय व राज्याअंतर्गत प्रकल्प सामंजस्य करार करून राष्ट्रीय प्रकल्प म्हणून न घेता शीघ्रतेने लाभ देणेसाठी राज्याच्या स्वनिधीतून राज्याअंतर्गत प्रकल्प म्हणून राबविणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२.० उत्तर कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नदी उपखोऱ्यात अदमासे ३७० अघफू अतिरिक्त पाणी शिल्लक आहे. त्यापैकी ११५ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेबाबतची तरतूद एकात्मिक राज्य जलआराखडयात करण्यात आली आहे. यापैकी २.७२ अघफू पाणी वापराच्या पूर्ण/बांधकामाधीन वळण योजना, २५.६ अघफू पाणी वापरासाठीच्या प्रकल्प अहवाल तयार असलेल्या वळण योजना व १४०.४३ अघफू पाणी वापरासाठी सर्वेक्षण प्रस्तावित योजना अशा एकूण १६८.७५ अघफू पाणी वापरासाठीच्या कोकणातून गोदावरी खोऱ्यात पाणी वळविण्यासाठीच्या योजनांची तरतूद आहे.

उपरोक्त १४०.४३ अघफू पाणी वापरासाठीच्या वळण /उदंचन योजनांचे प्राथमिक अभ्यास पूर्ण करून व्यवहार्य योजनांचे सर्वेक्षण व अन्वेषण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास मान्यता देणेबाबतची बाब ही शासनाच्या विचाराधीन होती.

३.० राज्य जलपरिषदेच्या सातव्या बैठकीत वैनगंगा (गोसीखुर्द)- नळगंगा (पूर्णा-तापी) नदीजोड प्रकल्प घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रस्तावित योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी तयार केला असून त्यानुसार ६२.७७ अघफू पाणी वळविणे प्रस्तावित आहे. सदर नदीजोड प्रकल्पातील मोठया प्रमाणावर भूसंपादन

टाळण्याकरिता मोठया प्रमाणात कालव्याऐवजी नलिका/बोगदा प्रस्तावित करून त्यासाठी करावयाच्या फेर-सर्वेक्षणाचे काम त्वरीत हाती घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

दिनांक ३०.७.२०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत उपरोक्त बाबीबाबत सादरीकरण झाले व त्यावर झालेल्या निर्णयानुसार दुष्काळग्रस्त मराठवाडयासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठी योजनांना तत्वत: मान्यता देण्याबाबत दि.२३.८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर विषयाबाबत दि. २८.८.२०१९ रोजी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयात दुष्काळग्रस्त मराठवाडयासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठी योजनांना तत्वत: मान्यता बाबतच्या दि. ३०.७.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या निर्णयात गिरणा उपखोऱ्याचा समावेश करण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे.

त्यानुषंगाने दि. २३.८.२०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून सुधारित शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**<u>सुधारित शासन निर्णय</u> :**

१. आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा, पार-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी इ. नदीजोड प्रकल्प राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्यात यावे.

२. उपरोक्त नदीजोड प्रकल्प हे प्रामुख्याने मराठवाडयातील तुटीच्या व गिरणा उपखोरे या अतितुटीच्या खोऱ्यातील भागासाठी असल्यामुळे विशिष्ट प्रकल्प म्हणून राबविण्यासाठी निधी वाटपाबाबत सदर प्रकल्पांना मा. राज्यपालांच्या सुत्राबाहेर ठेवण्याची विनंती मा. राज्यपाल महोदयांना करण्यात यावी.

३. प्रस्तावित नदीजोड प्रकल्प विविध महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विभागले गेले आहेत. त्यामुळे सदर प्रकल्पाच्या एकत्रित व एकसुत्रिय अंमलबजावणीसाठी थेट शासनाअंतर्गत स्वतंत्र मुख्य अभियंता कार्यालय (मुख्य अभियंता, नदीजोड विशिष्ट प्रकल्प) स्थापन करण्यात यावे व यासाठी मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प) या पदाची निर्मिती करावी.

४. खालील प्रस्तावित नदीजोड प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षण/अन्वेषणाचे उर्वरीत काम हाती घेण्यात यावे. त्यांचे प्राथमिक अन्वेषण अहवाल, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यांची व्यवहार्यता तपासून पुढील मंजूरीसाठी शासनास सादर करावेत.

अ) उल्हास, वैतरणा, नार-पार व दमणगंगा उपखोऱ्यातून प्रस्तावित गोदावरी खोरे (२९ योजना, १६८ अघफू पाणी वापर) व गिरणा उपखोरे वळण योजना.

ब) वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेत भूसंपादन टाळण्यासाठी कालव्याऐवजी नलिका / बोगदा प्रस्तावासाठी फेरसर्वेक्षण.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१९१४३६५९६३२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2019.09.19 14:42:59 +05'30'

**(र.रा.शुक्ला)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेते विधानसभा व विधानपरिषद
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव ,जलसंपदा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
११. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
१२. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४. सचिव (प्रकल्प व समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सचिव, (व्यय) वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१६. सचिव (वने) महसून व वन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७. सचिव (मुदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१८. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
१९. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२०. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
२१. मु.अ.(जसं) व सस (जलसंपदा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय
२२. कार्यासन निवडनस्ती.